# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २९३/२०२४ दिनांक- १२/०८/२०२४.

## Investment Scheme/ Fake Link द्वारे ऑनलाईन फसवणूक झालेल्या तक्रारदार यांना एकुण ९८,९६०/- रक्कम परत करण्यास सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे श्रीमती. आस्था अग्रवाल यांना त्यांचे मोबाईलवर व्हॉट्रसअॅप द्वारे लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता काही वेळात तक्रारदार यांचे बँक खात्यातुन ४८,९६०/- रु. कपात झाल्याबाबतचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. यावरुन बनावट लिंकद्वारे फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्याने सायबर पोलीस ठाणे येथे आवक अर्ज क्र. १११२-बी/२०२३ दि.०९/०६/२०२३ रोजी तक्रारी अर्जाची नोंद घेण्यात आलेली आहे.

तसेच अर्नाळा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणारे श्री. मधुकर केदार यांना हॉटेल रेटींगच्या ग्रुप टास्कमध्ये पैशांची गुंतवणूक करण्यास सांगितले. काही टास्क पुर्ण केल्यानंतर त्यांना पैशांचा नफा देवुन त्यांचा विश्वास संपादन केला व अधिक रक्कम गुंतवण्यास सांगितले. अश्याप्रकारे तक्रारदार यांनी एकुण ५०,०००/- रु ची गुंतवणुक केली परंतु त्यांना कोणताही परतावा न दिल्याने तक्रारदार आर्थिक फसवणुक झाल्याने सदरबाबत तक्रारदार यांनी ऑनलाईन नॅशनल सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार नोंदवली. सदर तक्रारीचे अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांनी रक्कम वर्ग झालेल्या बँक खात्यासोबत तात्काळ पत्रव्यवहार केला आहे.

वरीलप्रमाणे तक्रारदार यांचेकडुन तक्रारी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांचे खात्यातुन झालेल्या व्यवहारचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यावर वळती झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदर प्राप्त माहितीच्या अनुषंगाने संबंधीत बँकेला पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम खात्यात गोठविण्याबाबत कळविण्यात आले. तक्रारदार यांची रक्कम संशयीत खात्यांमध्ये गोठविण्याची माहिती प्राप्त होताच मा. न्यायाकडे तक्रारदार यांची रक्कम परत त्यांना मिळण्याकरीता कारवाई करण्यात आली. **मा. न्यायालयाकडे सदरबाबत पाठपुरावा करुन तक्रारदार नामे श्रीमती. आस्था अग्रवाल यांची फसवणुक झालेल्या,रक्कमेपैकी ४८,९६०/- रु रक्कम व तक्रारदार श्री. मधुकर केदार यांची संबंधीत बँक खात्यांशी पत्रव्यवहार करुन ५०,०००/- रु अशी एकुण ९८,९६०/- रु रक्कम दोन्ही तक्रारदार यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.
- अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.
- Telegram Channel, facebook,Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर अॅड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास

जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.

- **Work From Home** नावाखाली **Online Youtube Vedio Link Task, Hotel/Movie Rating** या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds** मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- मोबाईलमध्ये कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये, तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.
- बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.
- आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.
- फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/पल्लवी निकम, मपोअं/स्नेहल पुणे, पोअं/ओंकार डोंगरे, पोअं/कुणाल सावळे यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**-------------0000------------**